छत्रपती संभाजीनगर । बीड । परभणी । लातूर । धाराशिव । नांदेड येथून एकाच वेळी प्रकाशित होणार दैनिक

दैनिक
बीड, छत्रपती संभाजीनगर,लातूर, धाराशिव, परभणी, जालना,नांदेड
मराठवाड्याचे प्रत्येक घडामोडीचे दर्पण
# मराठवाडा दर्शन
Mo.9028349999
MARATHWADA DARSHAN
E-Mail : marathwadadarshannews@gmail.com
संपादक : दत्तात्रय बालासाहेब हंडीबाग

प्रतिनिधी पाहिजेत
" दैनिक मराठवाडा दर्शनसाठी "
मराठवाड्यातील सर्व जिल्हे
तालुका, गावस्तरावर
प्रतिनिधी नेमणे आहेत.
:: संपर्क ::
MO.9028349999

बीड (महाराष्ट्र) | दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -१९९ | गुरुवार दि.०३ एप्रिल २०२५ | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७७८५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | DAILY | MARATHI | Year-02 | Issue -199 | THURSDAY DT.03 APRIL 2025 | RNI : MAHMAR/2023/87785 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# लोकसभेत वक्फ दुरुस्ती विधेयकाला मंजुरी
# बाजूने २८८, तर विरोधात २३२ मते पडली

**नवी दिल्ली : ऐतिहासिक वक्फ दुरुस्ती विधेयकाला बुधवारी मध्यरात्री लोकसभेने १२ तासांच्या वादळी चर्चेनंतर मध्यरात्री १.५५ वाजता मंजुरी दिली. विधेयकाच्या बाजूने २८८, तर विरोधात २३२ मते पडली. बुधवारी दुपारी १२ वाजता सुरू झालेली चर्चा मध्यरात्री १२.०५ वाजेपर्यंत चालली. पूर्वनियोजित कार्यक्रमानुसार रात्री ८ वाजता मतदान घेण्यात येणार होते; परंतु नंतर चर्चेची वेळ वाढवण्यात आली. मध्यरात्री चर्चा पूर्ण झाल्यानंतर मतदान घेण्याचे ठरविण्यात आले. लोकसभेत हे विधेयक मंजूर झाल्यानंतर आता राज्यसभेत मांडले जाईल. दरम्यान, मध्यरात्री २ वाजता लोकसभेत मणिपूरच्या विषयावर चर्चा सुरू झाली.**

तृणमूल काँग्रेसचे सौगत रॉय यांच्या प्रस्तावावर सर्वप्रथम मतदान घेण्यात आले. त्यानंतर विरोधकांनी सुचवलेल्या विविध दुरुस्त्यांवर आवाजी मतदानाने कल घेण्यात आला. वक्फवर गैरमुस्लिमांची नियुक्ती रोखावी का, यावर मतदान घेण्यात आले. विधेयकाच्या बाजूने १९६ व विरोधात २४३ मते पडली. येथे एकूण ४३९ मते पडली. मध्यरात्री १.०४ वाजता हे मतदान घेतले.

तत्पूर्वी, देशभरात प्रखर विरोधाचा सामना करावा लागत असलेले वादग्रस्त वक्फ सुधारणा विधेयक, २०२४ हे केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री किरेन रिजिजू यांनी बुधवारी लोकसभेत मांडले होते. या विधेयकावर सभागृहात झालेल्या १२ तासांच्या चर्चेत काँग्रेस, समाजवादी पक्षासह आणखी (पान १ वरून) काही पक्षांनी अतिशय कडक टीका केली. चर्चेला सुरूवात करताना रिजिजू म्हणाले की, या विधेयकाचा धर्माशी नव्हे तर मालमत्तांशी संबंध आहे. तर काँग्रेसचे खासदार गौरव गोगोई म्हणाले की, राज्यघटनेच्या मूलभूत रचनेवर घाला घालण्याकरिता तसेच अल्पसंख्याकांना बदनाम करण्यासाठी हे विधेयक आणण्यात आले असून, त्याला इंडिया आघाडीचा विरोध आहे. रिजिजू म्हणाले, वक्फ मालमत्तांची पारदर्शक कारभाराच्या माध्यमातून देखभाल व्हावी, यात तंत्रज्ञानाचा सहभाग वाढावा म्हणून हे सुधारणा विधेयक तयार करण्यात आले आहे.

अखिलेश म्हणाले- रिजिजू यांनी सांगावे की चीनने त्यांच्या राज्यात किती गावे वसवली आहेतसपा प्रमुख अखिलेश यादव म्हणाले की, मंत्री म्हणत आहेत की संरक्षण आणि रेल्वेची जमीन भारताची आहे. मीही यावर विश्वास ठेवतो. संरक्षण आणि रेल्वेच्या जमिनी विकल्या जात नाहीत का?



## केसी वेणुगोपाल म्हणाले- धर्माच्या नावाखाली भारत मातेचे विभाजन केले जात आहे

काँग्रेस खासदार केसी वेणुगोपाल म्हणाले इथे धर्माच्या नावाखाली भारत मातेचे विभाजन केले जात आहे. रिजिजूजी, या विधेयकात तुम्ही गैर-मुस्लिमांनाही सहभागी करून घेत आहात. वैष्णोदेवी मंदिर कायद्यात असे म्हटले आहे की उपराज्यपाल हे अध्यक्ष असतील आणि जर ते हिंदू नसतील तर ते एखाद्याला नामनिर्देशित करू शकतात. मी याचे समर्थन करू शकतो. तुम्ही वक्फ बोर्डाशी भेदभाव का करत आहात? वक्फ बोर्ड देखील धार्मिक आहे. केरळमध्ये, एक आमदार देवस्थानम बोर्डावर कोणालाही नामांकित करू शकतो, तो आमदार हिंदू असेल. मुस्लिम राहणार नाही. देवस्थानम बोर्डाचा सदस्य निवडण्याचा अधिकार कोणत्याही मुस्लिम किंवा ख्रिश्चन आमदाराला नाही.

# भोपा येथील स्वस्त धान्य दुकानदाराच्या अरे रावीला नागरिक वैतागले
## अंगठा लावुनही धान्य देण्यास नकार

**पुरवठा विभागाचे नायब तहसीलदार ही देतात उडवा उडवी ची उत्तरे. कारवाई न केल्यास आंदोलन करणार -घडगे**

किल्ले धारूर /प्रतिनिधी

भोपा येथील स्वस्त धान्य दुकानदाराचा मनमानी कारभार दिवसेंदिवस वाढतच असुन, सदर दुकानदार नागरिकांचे अंगठ्याचे ठसे घेऊन ही धान्य देत नसल्याची तक्रार भोपा येथील अनेक नागरिक करत आहेत. त्यामुळे बहुतांश नागरिक रेशनच्या धान्यापासून वंचित राहत आहेत. तरी पुरवठा विभागाच्या जबाबदार वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मनमानी करणाऱ्या भोपा येथील दुकानदारावर कारवाई



करून, त्याचा परवाना निलंबित करावा.अन्यथा यासाठी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. असा अशोक घडगे यांनी दिला आहे.तेलगाव पासुन जवळच असलेल्या भोपा ता.धारूर येथील स्वस्त धान्य दुकानदार गेल्या कांही वर्षापासुन मनमानी कारभार करत असुन, त्याच्या विरोधात कुणी बोलले तर तो त्या बोलणारास रेशनचे धान्य देत नाही.असे येथील ग्रामस्थांनी सांगितले.याबाबत दोन दिवसापुर्वी पाडव्याच्या दिवशी भोपा येथील तरूण अशोक घडगे स्वस्त धान्य दुकानात धान्य आणण्यासाठी गेला होता.यावेळी सदर दुकानदाराने त्या तरूणाचा अंगठा घेतला.मात्र त्याला धान्य दिलेच नाही.उलट म्हणाला तुला धान्य देत नाही.तसेच तुझ्या घरातील कुणाचीही केवायसी ही करत नाही.तुला काय करायचे कर.कुठे ही तक्रार केली तरी माझे कांही होत नाही.असे दुकानदाराने म्हटल्याचे अशोक घडगे याने सांगितले.याबाबत धारूरचे पुरवठा अधिकारी नायब तहसीलदार यांना मोबाईलवरून झालेला प्रकार सांगितला असता.तुम्ही तहसील कार्यालयात येऊन त्या स्वस्त धान्य दुकानदाराची तक्रार करा.नंतर मी पाहतो.असे उत्तर देत उडवाउडवी करण्याचा प्रयत्न केला.दरम्यान भोपा येथील तो स्वस्त धान्य दुकानदार अनेक नागरिकांना अंगठे घेऊन ही धान्य देत नसल्याचे नागरिक सांगत आहेत. त्यामुळे या दुकानदारावर कारवाई करण्यास का कचरत आहेत. असा प्रश्न नागरिक करत आहेत. तरी याप्रकरणी पुरवठा विभागाने भोपा येथील त्या दुकानदारावर कारवाई केली

### पुरवठा अधिकाऱ्याशी अर्थपुर्ण व्यवहार त्यामुळेच कारवाईस टाळाटाळ... !

धारूर तहसील कार्यालयाचे पुरवठा अधिकारी यांचे भोपा येथील संबंधित स्वस्त धान्य दुकानदाराशी अर्थपुर्ण व्यवहार असल्याने ते त्या दुकानदारावर कारवाई करण्यास टाळाटाळ करत असल्याची चर्चा भोपा येथील नागरिकांतून ऐकावयास मिळाली.त्यामुळे पुरवठा अधिकारी आता तरी कारवाई करतील का?असा प्रश्न नागरिक करत आहेत.

# साधु संत येति घरा तोचि दिवाळी दसरा वेदमुर्ती पंढरपूर देवस्थानचे
## विश्वस्त अहिल्यानगर जिल्ह्याचं भुषण ह.भ.प. भास्करगिरी महाराज यांची स्व. बाळासाहेब भारदे दत्तमंदिरास सदिच्छा भेट

अविनाश देशमुख ।शेवगांव

दिनांक ०२ एप्रिल २०२५ वार बुधवार या बाबत सविस्तर वृत्त असे की अहिल्यानगर जिल्ह्याचं भुषण ह.भ.प. महंत भास्करगिरी महाराज श्री दत्त देवस्थान देवगड यांची आज सकाळी स्व बाळासाहेब भारदे गल्ली मधील ऐतिहासिक दत्तमंदिरास भेट दिली व मनोभावे दर्शम घेतले यावेळी श्री. वेणीमाधव भारदे व सौ. वंदनाताई भारदे या उभय दांपत्याने त्याने स्वागत केले यावेळी महंत १००८ श्री अच्युतानंद सरस्वती गुजरात यांच्या उपस्थितीत दत्तमंदिरात भाविक भक्तांनी स्वागत केले यावेळी बुवा नारायणदास बैरागी यांनी सूत्र संचालन केले यावेळी श्री वेणीमाधव रघुनाथ भारदे यांनी दत्त मंदिराचे ऐतिहासिक महत्व महाराजांना सांगितले श्रीदत्त मंदिरात श्रीक्षेत्र देवगड येथील मठाधिपती प.पू.भास्करगिरि महाराज यांचे अचानक येणे झाले. त्यांचे दर्शन, भक्त मंडळीना आशीर्वचन याचा लाभ घेता



आला. बरेच दिवसांपासून प.पू. भास्करगिरी महाराज श्रीदत्त मंदिरात यावेत अशी भक्त मंडळी यांची सुप्त ईच्छा होती ती अखेर आज अचानक पूर्ण झाली. खूप खूप प्रसन्न आणि प्रचंड ऊर्जा अनुभवायला मिळाली. धन्य आजी दीन झाले संतांचे दर्शन



किल्लेधारुर/अविनाश जगताप

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ वर्षातील पदवी वितरण समारंभाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर विद्यापीठ गीताचे गायन करण्यात आले. समारंभाचे प्रमुख अतिथी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य तथा केज येथील सरस्वती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गौतम पाटील यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

# एम टी एस ओलंपियाड परीक्षेत सरस्वती प्राथमिक विद्यालयाचे घवघवीत यश
## विद्यार्थ्यांनी मिळवली ट्रॉफी,गोल्ड मेडल,सिल्वर मेडल

किल्ले धारूर/अविनाश जगताप

शहरातील शैक्षणिक क्षेत्रामध्ये अग्रस्थानी असलेल्या व सर्वात जुन्या सरस्वती प्राथमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी ऑलिंपियाड एमपीएस स्पर्धा परीक्षेमध्ये घवघवीत यश मिळवले आहे या स्पर्धा परीक्षेत विद्यार्थ्यांनी ट्रॉफी गोल्ड मेडल सिल्वर मेडल ब्रांच मेडल असे विविध प्रकारचे मेडल मिळवून आपले गुणवत्ता सिद्ध केले आहे या सर्व विद्यार्थ्यांचा सत्कार मुख्याध्यापक तुकाराम डोंगरे तसेच सर्व शिक्षकांचे उपस्थितीमध्ये करण्यात आला. एम टी एस ओलंपियाड स्पर्धा परीक्षा ५ जानेवारी रोजी झाली होती. त्याचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला त्यात सरस्वती प्राथमिक विद्यालयाच्या पुढील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले आहेइकरा मोसीन मुलानी- गोल्ड मेडल ,वेदिका अशोक बोराडे गोल्ड मेडल,सय्यद उमेर जिलानी गोल्ड मेडल ,जय महेश घोळवे सिल्वर मेडल ,वंश विपीन पढियार - सिल्वर मेडल ,स्वराज नितीन काळे -सिल्वर मेडल ,आराध्या किशोर बोराडे -




उत्तीर्ण समर्थ बालाजी मुळे -उत्तीर्ण ,शिवण्या दत्तात्रय जाधव -उत्तीर्ण श्लोक बाबासाहेब फावडे -उत्तीर्ण.

या विद्यार्थ्यांनी यश मिळवले यानिमित्त प्राथमिक शाळेच्या वतीने यशस्वी विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार करण्यात आला. मुख्याद्यापक तुकाराम डोंगरे , सहशिक्षक अमर शुक्ला ,गणेश वरकले,रवी कुंभार,अशोक तळस्कर,विजय काळे ,उषा मुंडे मॅडम,ज्योती काळे मॅडम, आदर्श नवोदय तज्ञ शिक्षक नाथा ढगे इत्यादींनी अभिनंदन करून विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.

# खा.सोनवणे बैठक टाळून दिल्लीमधे : वक्फ सुधारणा विधायकावर मतदान

बीड: पालकमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत दि.२ एप्रील रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात विविध विकास कामाचा आढावा बैठक असल्याने खा.बजरंग सोनवणे हे दि.१ एप्रील रोजी रात्री दिल्लीहुन केजला आले होते. दि.२ रोजी संसदेत वक्फ सुधारणा विधेयकावर आजच मतदान होणार असल्याने ते बीड येथील बैठक टाळून तातडीने दिल्लीला वक्फ संशोधन विधेयकावर होणा-या मतदानात सहभागी होण्यासाठी रवाना झाले.

खा.बजरंग सोनवणे वारंवार बीड जिल्ह्यातील विकासाचे आणि सामाजिक मुद्दे प्रभावीपणे संसदेत मांडत आहेत. खा.सोनवणे यांनी रेल्वे, शेती, आरोग्य आदि विषयावर जिल्ह्याचे गाऱ्हाणे केंद्रात मांडलेले आहे. त्यांनी मागणी केलेल्या अनेक मागण्या मंजूर केल्या आहेत. बीड जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये दि.२ रोजी उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजित पवार यांच्या उपस्थितीत जिल्हा विकास कामांची आढावा बैठक आयोजीत केली होती. या बैठकीसाठी ते बीड येथे आलेही होते, मात्र, वक्फ सुधारणा विधेयकावर संध्याकाळी संसदेमध्ये मतदान होणार असल्याने, ही महत्त्वाची बैठक टाळून ते तातडीने दिल्लीला रवाना झाले. जिल्ह्यातील विकास कामांबाबतचे निवेदन पालकमंत्री ना. अजित पवार यांच्याकडे पाठविण्यात आल्याचे कळविण्यात आले आहे.



# दीनदयाळ नागरी सहकारी बँकेस ३१ मार्च २०२५ अखेर २ कोटी ४७ लाखांचा नफा

## दीनदयाळ बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की व उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख यांची माहिती

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

'विश्वास, विकास आणि विनम्रता' या त्रिसुत्रीनुसार कार्यरत असलेली दीनदयाळ नागरी सहकारी बँक मराठवाड्याच्या सहकार क्षेत्रात मागील २८ वर्षांत नांवारूपास आली आहे. आर्थिक क्षेत्रात वेगाने प्रगतीकडे वाटचाल करणारी बँक म्हणून ही आज दीनदयाळ बँकेकडे पाहिले जाते. सर्वसामान्य माणूस केंद्रबिंदु मानून समाजाच्या सर्वच क्षेत्रात आर्थिकदृष्ट्या संपन्नता आणण्यासाठी दीनदयाळ बँक कटीबध्द आहे. आर्थिक क्षेत्रात आश्वासक व दमदार पाऊले टाकणाऱ्या दीनदयाळ बँकेला ३१ मार्च २०२५ अखेर २ कोटी ४७ लाख रूपयांहून अधिकचा करपूर्व नफा झाला असल्याची माहिती दीनदयाळ बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की व उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकाद्वारे दिली आहे.

दीनदयाळ बँकेची ३१ मार्च २०२५ (आर्थिक वर्ष २०२४ - २०२५) अखेर आर्थिक वर्षासाठीचे अलेखापरीक्षीत आर्थिक परिणाम सांख्यिकीय माहिती पुढीलप्रमाणे आहे (कंसातील सर्व नमुद आकडे हे कोटीत आहेत.) एकूण संकलित ठेवी (५६०.४०), कासा ठेवी प्रमाण - २७.४१ टक्के, एकूण वितरीत कर्जे (३३१.१६), एकूण गुंतवणुक (१७४.०२), भागभांडवल (१७.०३), एकूण गंगाजळी (३८.९९), निव्वळ ढोबळ मालमत्ता (५६.०२), खेळते भांडवल (६४१.१३), बँकेने एकूण (८९१.५५) एवढा व्यवसाय केला आहे. तर बँकेस तब्बल २ कोटी ४७ लाख इतका निव्वळ करपूर्व नफा झाला आहे. तर ढोबळ अनुत्पादक कर्जे (२३.७८), अनुत्पादक कर्जे (नेट एनपीए) चे प्रमाण ७.१८ टक्के एवढे आहे. आणि नक्त अनुत्पादक कर्जे १.५३ टक्के (ता.क. - वार्षिक लेखा विवरण असल्याने उपरोक्त आकडेवारीत लेखापरीक्षणाप्रमाणे अंशतः बदल संभवतो.) दीनदयाळ बँकेचे संपूर्ण महाराष्ट्र राज्य हे कार्यक्षेत्र आहे. तसेच बँकेच्या संपूर्ण महाराष्ट्रात एकूण १७ एवढ्या शाखा कार्यरत असून अंबाजोगाई येथे बँकेचे अद्ययावत मुख्य कार्यालय हे स्वत:च्या मालकीच्या भव्य इमारती मध्ये कार्यरत आहे. बँकेच्या वतीने प्रतिवर्षी युगपुरूष स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात येते. मागील २३ वर्षांपासून राज्यातील व राज्याबाहेरील अनेक नामवंतांनी आपल्या अमोघ वाणीने अंबाजोगाईकरांना, ज्ञान, अध्यात्मिक, सांस्कृतिक व मनोरंजनात्मक मेजवानी दिलेली आहे. याआधी वृक्षारोपण तसेच पाणी टंचाईच्या काळात बँकेचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी श्रमदानातून बंधारा बांधला आहे. मुक्या जनावरांसाठी


दीनदयाळ नागरी सहकारी बँक, अंबाजोगाई



ॲड.मकरंद पत्की (अध्यक्ष) ॲड.राजेश्वर देशमुख (उपाध्यक्ष)

बँकेच्या वतीने पाणपोईची सुविधा करण्यात आलेली होती. मागील काही वर्षांत बँकेच्या मुख्यालयास सुप्रसिद्ध समाजसेवक, आर्थिक व व्यवस्थापन क्षेत्रातील तज्ज्ञ, सहकार आणि राजकीय क्षेत्रातील जाणकार, शिक्षण तज्ज्ञ, सिने व नाट्य कलावंत, लेखक, व्याख्याते, अध्यात्मिक व धार्मिक क्षेत्रातील आदरणीय व्यक्ती, आर.बी.आय.चे वरीष्ठ अधिकारी या मान्यवरांनी वेळोवेळी बँकेस भेटी देवून आपले अभिप्राय नोंदविले आहेत. कोविड सारख्या संकटकाळात तसेच सातत्यपूर्ण सर्व ग्राहकांना दर्जेदार व तत्पर बँकिंग सेवा दिल्याबद्दल ग्राहकांच्या वतीने बँकेस वेळोवेळी लेखी प्रशंसा व गौरवपत्र प्राप्त झालेले आहेत. तसेच दीनदयाळ नागरी सहकारी बँकेच्या शिरपेचात २०२३ साली मानाचा तुरा रोवला गेला आहे. तो म्हणजे बँकेच्या सर्वांगिण कार्याची दखल घेऊन सलग दुसऱ्या वर्षी ४०० ते ५०० कोटी रूपयांच्या ठेवी जमविलेल्या गटात दीनदयाळ बँकेस 'बँको ब्ल्यू रिबन' या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने यापूर्वी गौरविण्यात आले आहे. बँकेने नेहमीच सभासद, ठेवीदार, कर्जदार, ग्राहक व हितचिंतक यांचा विश्वास संपादन केला आहे. तत्पर व दर्जेदार बँकींग सेवा, सुविधा उपलब्ध करून देत दीनदयाळ बँकेने सहकार क्षेत्रात 'बिना संस्कार, नही सहकार' हा संस्कार जोपासला आहे. एक परिवार म्हणून काम करताना 'विश्वास, विकास आणि विनम्रता' हे ब्रीद घेऊन आश्वासक प्रगती साधली आहे. सध्या बँकेच्या मराठवाड्यात अंबाजोगाई, माजलगाव, परळी वैजेनाथ., पालम, परळी रोड, नांदेड, उदगीर, लातूर, देगलूर, परतूर, धारूर, नायगांव बाजार, परभणी, छत्रपती संभाजीनगर, अहमदपूर, जालना, बीड या ठिकाणी शाखा असून सुरूवाती पासूनच सामाजिक बांधिलकी मानून ही बँक आर्थिक क्षेत्रात कार्यरत आहे. संपूर्ण संगणकीकृत बँकींग सेवा दीनदयाळ बँक पुरविते, रूपे ए.टी.एम.ची तथा युपीआयची सेवा ही उपलब्ध आहे. बँकेच्या ए.टी.एम.मशीन मध्ये इतर सर्व राष्ट्रीयकृत बँकांचे ए.टी.एम.कार्ड वापरता येतात. बँकेच्या सर्वांगीण विकासात बँकेच्या संचालिका तथा महाराष्ट्र राज्याच्या पशुसंवर्धन, पर्यावरण आणि हवामान बदल या खात्याच्या सन्माननीय कॅबिनेट मंत्री महोदया ना.सौ.पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन तर संचालक रा.गो.धाट, संचालिका सौ.शरयुताई हेबाळकर, सर्व संचालक श्री.विजयकुमार कोपले, चैनसुख जाजु, इंजि.बिपीन क्षीरसागर, प्राचार्य किशन पवार, मकरंद कुलकर्णी, बाळासाहेब देशपांडे, डॉ.विवेक दडे, प्रा.अशोक लोमटे, जयकरण सुरेशकांबळे, तज्ज्ञ संचालक भिमा ताम्हाणे व बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे तसेच आर.बी.आय., सहकार खात्याचे आयुक्त, तथा निबंधक, उपनिबंधक, सहायक निबंधक तसेच बँकेचे सर्व अधिकारी, शाखाधिकारी, कर्मचारी, सभासद, ठेवीदार, खातेदार, कर्जदार, हितचिंतक आदींचे सातत्यपूर्ण सहकार्य लाभत असल्याची माहिती दीनदयाळ बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की व उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकाद्वारे दिली आहे. याबाबत आमच्या प्रतिनिधीशी बोलताना दीनदयाळ बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सनतकुमार बनवसकर म्हणाले की, ३१ मार्च २०२५ अखेर प्रत्येक बँकरला उत्कंठा असते ती अंतिम आर्थिक निकालाची वर्ष आलं तसं जात असतं. परंतू, वर्षभरात केलेल्या प्रयत्नांचे जणू उत्तरच मिळावे. तो आनंद, ते समाधान आणि नव्या आर्थिक वर्षाची नांदी, अशा संमिश्र भावनांची गर्दी मनात होते. पण, या भावनाच मनाला निश्चितच उभारी देऊन जातात. मार्च - २०२४ पासून ते मार्च - २०२५ पर्यंतचा कालावधी हा सर्वार्थाने नफा - तोटा पत्रकावर परिणाम करणारा होता, आपण सर्वजण हे जाणताच, त्यातही यावर्षी प्रामुख्याने ठराविक महिन्यांचा कार्यकाल, तशातच अनेक अडचणी, कर्मचाऱ्यांचे आजारपण, हे सर्व असताना ही 'प्रयत्नांती परमेश्वर' या उक्तीची अनुभूती यावी व 'टीम-वर्क' काय असते त्याचे उत्तर मिळावे. तसेच मा.संचालक मंडळाचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, कर्मचाऱ्यांचे टीमवर्क, संस्थेविषयीचे प्रेम व निष्ठा. खातेदारांचा उत्साह, सभासदांचे योगदान आहे. यामुळेच की काय या मंदीच्या कालावधीत ही बँकेने चांगला परफॉर्मन्स केला आहे. अर्थातच हे सर्व सांगण्यामागचे प्रयोजन अभिनंदन करावे हेच आहे. या सर्व अडचणींतून मार्ग काढत आमचे सहकारी, शाखाधिकारी ते सर्व शिपाई व मुख्यालयातील विभागप्रमुख व सहकारी यांचे सामुहिक प्रयास, योगदान हे या आर्थिक निकालाचे मानकरी आहेत. हे येथे निश्चितच उल्लेखनीय होय. चरितार्थ चालविण्यासाठी काम करावेच लागते, संस्थेचा उत्कर्ष हे उद्दिष्ट समोर ठेवून सातत्याने प्रयत्नरत असावे, हा आपल्या कार्यामागील प्रपंच असावा. नव्हे तोच आपल्या कार्याचा मुख्य आधार असावा. सर्वांचे हार्दिक अभिनंदन व बँकेसाठी पुढील आर्थिक वर्ष २०२५ - २०२६ हे ही उत्कृष्ट निकालाचे वर्षे ठरावे

# नवा इन्कम टॅक्स लागू झाला, आता पगारावर किती पैसे वाचणार?




१ एप्रिलपासून नवीन आर्थिक वर्ष सुरू झाले आहे. नवीन कर प्रणाली आणि जुन्या कर प्रणालीमध्ये अर्थसंकल्पात केलेले बदल कालपासून लागू झाले आहेत. १ फेब्रुवारी रोजी सादर झालेल्या अर्थसंकल्पात अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी नवीन कर प्रणाली अंतर्गत १२ लाख रुपयांपर्यंत कमाई करणाऱ्यांचा कर शून्यावर आणला होता.या अर्थसंकल्पात जुनी करप्रणाली जशीच्या तशी ठेवण्यात आली होती. अशा स्थितीत जुनी कर व्यवस्था चांगली की नवीन कर व्यवस्था, असा प्रश्न आता निर्माण झाला आहे. यासोबतच नवीन कर प्रणालीमध्ये कराची बचत कशी करता येईल आणि यामध्ये करदात्याला एकूण किती फायदा होणार आहे. याची माहिती आपण घेणार आहोत.

नवीन कर प्रणालीमध्ये स्टँडर्ड डिडक्शन

नवीन कर प्रणालीमध्ये सरकार १२ लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावर कोणताही कर आकारत नाही. याशिवाय, पगारावर आधारित लोकांना नवीन कर प्रणालीमध्ये ७५ हजार रुपयांचे स्टँडर्ड डिडक्शन देखील मिळते, त्यामुळे जे लोक आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये नवीन कर प्रणाली निवडतात. त्यांना १२.७५ लाख रुपयांपर्यंतच्या कमाईवर कोणताही कर भरावा लागणार नाही.

उदाहरणार्थ- जर तुमचे उत्पन्न २० लाख असेल तर तुम्हाला

- ०-४ लाख रुपयांपर्यंत - ० कर लागले
- ४-८ लाख रुपयांपर्यंत ५ टक्के कर लागेल म्हणजे तो २०,००० रुपये होईल
- ८-१२ लाख रुपयांपर्यंत १० टक्के लागेल म्हणजे तो ४०,००० रुपये होईल
- १२-१६ लाख रुपयांपर्यंत १५ टक्के कर लागेल म्हणजे तो ६०,००० रुपये होईल
- १६ - २० लाख रुपयांपर्यंत २० टक्के कर लागेल म्हणजे तो ८०,००० रुपये होईल

या सगळ्या करांची बेरीज केली तर २० लाख उत्पन्नावर तुम्हाला २ लाख रुपये टॅक्स द्यावा लागेल.

ढऊ्ढ मर्यादा वाढवली

काय बदलले आहे: काही पेमेंट्सवर ढऊ्ढ ची मर्यादा वाढवण्यात आली आहे.

भाड्याच्या उत्पन्नावर ढऊ्ढ सूट दुप्पट:

भाड्याच्या उत्पन्नावरील ढऊ्ढ मर्यादा २.४ लाख रुपयांवरून ६ लाख रुपयांपर्यंत वाढली आहे.

ज्येष्ठ नागरिकांसाठी व्याज उत्पन्नावरील सवलत दुप्पट: बँक एफडीमधून व्याज उत्पन्न मिळवणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांसाठी टीडीएस मर्यादा ५० हजारांवरून १ लाख रुपयांपर्यंत वाढली आहे.व्यावसायिक सेवांवरील टीडीएस मर्यादेत वाढ: व्यावसायिक सेवांवरील टीडीएस मर्यादा

# पत्रकार धनंजय आरबुने यांना वास्तववादी लिखाणासाठी पुरस्कार प्रदान



परळी/प्रतिनिधी

सिंदखेड राजा हे परगणा लखोजीराव जाधव यांच्या राजवाड्यासाठी प्रसिद्ध आहे. हा राजवाडा सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धात जिजाबाईंचे वडील लखुजी जाधव यांनी बांधला होता . जिजाबाईंचा जन्म १२ जानेवारी १५९८ रोजी याच ठिकाणी झाला.ख्यातनाम बहुजन साहित्य संघ, चिखलीच्या वतीने मातृतीर्थ सिंदखेडराजा नगरीतील राजे लखुजी जाधव साहित्य नगरी, येथे संपन्न झालेल्या साहित्य संमेलनात परळी येथील ज्येष्ठ पत्रकार धनंजय आरबुने यांना त्यांच्या वास्तववादी व सामाजिक लिखाणा बद्दल पुरस्कार प्रदान करण्यात आला,राजमाता जिजाऊंच्या जन्मस्थळावर प्रांत तथा जिल्ह्यातून आवर्जून उपस्थित झालेल्या साहित्यिक, कवी,आणि लेखक व रसिक माता भगिनींना सर्व मान्यवरांची मोठी उपस्थिती होती. या साहित्य संमेलनात आपल्या वैविध्यपूर्ण लेखनाने वास्तववादी विषय मांडून सामाजिक जागृती करणारे परळी येथील जेष्ठ पत्रकार धनंजय आरबुने यांना त्यांच्या लिखाणाबद्दल पुरस्कार प्रदान करण्यात आला. या निवडीचे सर्व स्तरातून स्वागत होत असून विविध साहित्यिक, लेखक, पत्रकार यांनी त्यांना फोन करून तसेच प्रत्यक्ष भेटून शुभेच्छा दिल्या

# कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पाचे पाणी नदीपात्रात सोडण्याच्या मागणीसाठी नागरिक आक्रमक

## वेळेत मागणी पूर्ण न झाल्यास परळी-अंबाजोगाई महामार्गावर रस्ता रोको करणार - राजेभाऊ फड

परळी ।प्रतिनिधी

उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून सूर्य आग ओकत आहे. यामुळे वातावरणातील तापमानात प्रचंड मोठ्या प्रमाणावर वाढ झाली असून जनावरांसाठी पाण्याची मोठी समस्या निर्माण होऊ लागलेली आहे. त्याचप्रमाणे काही भागातील जलस्त्रोत पातळीही खालावली असल्याने पाण्याचे दुर्भिक्ष निर्माण होत आहे. ही बाब लक्षात घेऊन कन्हेरवाडी लघु सिंचन प्रकल्पाचे पाणी नदीपात्रात सोडण्यात यावे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी केली आहे. यापूर्वीही प्रशासनाला मागणी करण्यात आली असून त्यावर अद्याप कोणतीही




कार्यवाही करण्यात आलेली नाही. यामुळे नागरिक संतप्त झाले असून दिनांक १० एप्रिल पर्यंत नदीपात्रात पाणी सोडले नाही तर ११ एप्रिल रोजी कन्हेरवाडी येथे गावातील सर्व ग्रामस्थ रस्ता रोको आंदोलन करतील असा तीव्र इशारा देण्यात आला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी बीडचे जिल्हाधिकारी, गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी अभियंता, जिल्हा पोलिस अधीक्षक, उपविभागीय अधिकारी तथा परळी ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक यांना पत्र लिहिले असून त्याद्वारे आंदोलनाचा तीव्र इशारा देण्यात आला आहे. १० एप्रिल पर्यंत कान्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पाचे पाणी नदीपात्रात सोडले नाही तर ११ एप्रिल रोजी कन्हेरवाडी येथे परळी - अंबाजोगाई महामार्गावर ग्रामस्थांसह तीव्र स्वरूपाचे रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. सद्य स्थितीत निर्माण झालेली पाण्याची कमतरता आणि संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पाचे पाणी नदीपात्रात सोडण्यात यावे. जेणेकरून जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची समस्या दूर होईल तसेच कन्हेरवाडी गाव, जिरेवाडी, बँक कॉलनी, समता नगर, जलालपूर, शंकर - पार्वती नगर, इंदपवाडी, ब्रह्मवाडी भागातील जलस्त्रोत पातळीत वाढ होऊन याचा नागरिकांना दिलासा मिळणार आहे. करिता आपण या मागणीचा गांभीर्यपूर्वक विचार करावा आणि योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करून नदीपात्रात पाणी सोडावे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी केली आहे. मागणी वेळेत पूर्ण न झाल्यास ग्रामस्थ तीव्र आंदोलन करण्याच्या पवित्र्यात असून याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनावर असेल

# इंदिरा नगर, जयभीम कॉलनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती जाहीर

## अध्यक्ष महेश आदमाने,उपाध्यक्ष प्रतिक भालेराव तर सचिवपदी साहिल रोडे यांची निवड



परळी ।प्रतिनिधी

इंदिरा नगर, जयभीम कॉलनी येथील विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४व्या जयंती उत्सव समितीची सामाजिक कार्यकर्ते अनंतराव इंगळे,बाबासाहेब गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली एकमताने जाहीर करण्यात आली. इंदिरा नगर,जयभीम कॉलनी येथील लिंबुनी बौद्ध विहार येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर व्यापक बैठक घेण्यात आली.याबैठकीला प्रमुख्याने सामाजिक कार्यकर्ते अनंतराव इंगळे,बाबासाहेब गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली हि बैठक संपन झाली यामध्ये विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती प्रतिवर्षा प्रमाणे साजरी करण्यात येणार असल्याचे ठरवले असुन या नियोजनासाठी कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून अध्यक्ष व खजिनदार म्हणून महेश वामनराव आदमाने तर उपाध्यक्षपदी प्रतीक भालेराव तसेच सचिवपदी साहिल रोडे यांची एकमताने निवड करण्यात आली आहे.या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती उत्सवा अंतर्गत शहरात भव्य मिरवणूक,अन्नदान अदी कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करणार असल्याचे सांगितले.याप्रसंगी इंदिरा नगर, जयभीम कॉलनी येथील समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



मराठा सेवा संघ संचलित जिजाऊ रथयात्रा अंतर्गत मराठा जोडो अभियान व शिवसंकल्प अभियान या ऐतिहासिक उपक्रमाचे माजलगाव शहरात भव्य स्वागत करण्यात आले यावेळी राष्ट्रमाता जिजाऊ व छत्रपती शिवाजी महाराजांची वेशभूषा केलेले सानवी झोडगे, रागिणी कुलकर्णी, शौर्य जाधव

# अजित पवार यांनी घेतला विविध विकासकामांचा आढावा

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्हयातील विमानतळ, रेल्वे कामाची सद्यस्थिती, राष्ट्रीय महामार्ग, जिल्हा परिषदे अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजना, शिक्षण विभागाचे नवोपक्रम, इनक्यूबेशन सेंटर तसेच तारांगण, विद्युत वितरण, जिल्हयात सुरू असलेल्या विविध विकास कामांचा आज उपमुख्यमंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी आढावा घेतला. बीड जिल्हयांच्या सर्वांगिण विकासासाठी प्रशासन, लोकप्रतिनिधी व सर्व मिळून काम करू, विमानतळ, रेल्वे तसेच महत्वाच्या प्रलंबित कामांना गती देण्यासोबतच विकासकामासाठी निधी कमी पडू देणार नाही, असेही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज येथे सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आज उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी आढावा घेतला. यावेळी पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे, सर्वश्री आमदार सतिष चव्हाण, विक्रम काळे, प्रकाश सोळंके, सुरेश धस, संदीप क्षीरसागर, विजयसिंह पंडीत, उपमुख्यमंत्री यांचे सचिव राजेश देशमुख, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी अविनाश पाठक, जिल्हा पोलीस अधिक्षक नवनीत काँवत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अदित्य जीवने यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

बीड जिल्हयांच्या सर्वांगिण विकासासाठी लोकप्रतिनिधी, प्रशासन व आपण सर्व नागरिक यांचा समन्वय महत्त्वाचा आहे. राज्य शासनाकडून जिल्हयातील विकासकामासाठी निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही. अशी ग्वाही देतानाचा त्यांनी सांगितले की, अनेक वर्षापासून रेल्वेमार्गाच्या सुरू असलेल्या कामाला गती देण्यात येईल. विभागीय आयुक्त बीड रेल्वेबाबत दर महिन्याला आढावा घेतील. रेल्वे मार्गाच्या कामात कोणी अडथळा आणत असेल तर त्यांची गय केली जाणार नाही, अशा प्रकरणी थेट सरकारी कामात अडथळा आणल्याबाबतचे गुन्हे नोंदविण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

विमानतळासाठी आवश्यक जागा बीड शहरापासून १४ किमी अंतरावर असलेल्या कामखेडा नजीक निश्चित करण्यात आली आहे. रेल्वे तसेच विमानतळ सेवा गतीने पुर्ण करण्यात येईल, विमातळाबाबतच्या




## आकर्षक असेल तारांगण

एक उत्तम आणि अद्ययावत तारांगण उभारण्यात येणार आहे. यामध्ये सर्व जिल्हाभरातील शाळकरी मुलांना सहलीच्या माध्यमातून माहिती मिळावी हा या उभारणीचा हेतू आहे. बीड शहरात येणाऱ्या प्रत्येकासाठी एक उत्तम पर्यटन स्थळ देखील या तारांगणाच्या रूपाने उभे राहणार आहे. येथील आयटीआयच्या मोकळ्या जागेत २० कोटी रूपयांचा निधीतून तारांगण उभारण्याची योजना आहे. विद्यार्थ्यांनी बनविलेल्या विविध कलाकृती आणि जिल्हयातील प्रेक्षणीय स्थळांच्या प्रतिकृती ठेवण्याचे नियोजन आहे.



## मराठवाड्यातील पहिले कौशल्यवर्धन केंद्र

शहराच्या मध्यवर्ती भागात आय. टी. आय. च्या तीन एकर परिसरात कौशल्यवर्धन केंद्र उभारण्यात येणार आहे. टाटाच्या सहकार्याने हे केंद्र आकारास येईल. कंपनीतर्फ १६५.१० कोटी आणि एमआयडीसी कडून ३१.११ कोटी असे एकूण १९६.९८ कोटी खर्च करून याची उभारणी करण्यात येणार आहे. मराठवाड्यातील हे पहिले कौशल्यवर्धन केंद्र ठरणार आहे. याआधी विदर्भात चंद्रपूर आणि गडचिरोली व कोकणात रत्नागिरीत अशा केंद्राच्या कामाला सुरुवात झाली आहे.

## कालबद्ध निधी विनियोग

यंदाच्या आर्थिक वर्षात नियोजनपूर्ण निधी विनियोग करण्याचे संकेत श्री. पवार यांनी दिले. लवकरच याबाबत बैठक घेऊन नियोजन निधीतील सर्व बाबी व यंत्रणा यांचा आढावा घेण्यात येणार असून तांत्रिक व प्रशासकीय मान्यता गतिमान पध्दतीने प्रदान करत डिसेंबर २०२५ पूर्वी निधी खर्च होईल तसेच काम दर्जेदार होईल, याची दक्षता घ्यावी, असे निर्देश त्यांनी दिले.



# खोलेश्वरच्या श्रृती शिंदे ची इस्त्रो अभ्यास दौऱ्यासाठी निवड

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

येथील खोलेश्वर माध्यमिक विद्यालयातील इ.७ वी तील विद्यार्थ्यीनी कु.श्रृती बबन शिंदे हिची बेंगलोर येथील इस्त्रो केंद्रात जाणाऱ्या अभ्यास सहलीसाठी निवड झाली आहे.इस्कॉन मंदिर लातूर च्या वतीने आयोजित भगवत गीतेवरील मूल्यशिक्षण परीक्षेत श्रुतीचा बीड जिल्ह्यात सर्व प्रथम क्रमांक आल्याने तीची या अभ्यास दौऱ्यासाठी निवड करण्यात आली आहे.तिच्या या यशाबद्दल तीचे अभिनंदन भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष.डॉ.सुरेंद्रजी आलूरकर,संस्थेचे कार्यवाह डॉ.हेमंतजी वैद्य,मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा. चंद्रकांतराव मुळे,खोलेश्वर शैक्षणिक संकुलातील सर्व केंद्रीय कार्यकारिणी सदस्य, स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष विजयराव वालवडकर,कार्यवाह किरण कोदरकर,माध्यमिक शालेय अध्यक्ष डॉ.अतुल देशपांडे,सर्व शालेय समिती सदस्य, विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक विवेक जोशी,पर्यवेक्षक सुर्यकांत उजगरे,पर्यवेक्षक प्रशांत पिंपळे,अभ्यास पुरक मंडळ प्रमुख श्रीकांत देशपांडे,विश्वास पत्की सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# अंबाजोगाई परिसरातील मिनिबँक म्हणून ओळखल्या जाणारी

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

ग्राहक हेच दैवत तसेच सर्वांना आपलं माननारी शहरवासीयांची मिनी बँक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री योगेश्वरी नागरी सहकारी पतसंस्थेस मार्च २०२५ अखेर रुपये ८५.२१ लक्ष एवढा निव्वळ नफा मिळाला आहे. ग्राहकांच्या दृढ विश्वासाने ५२ कोटीच्या ठेवी मिळवत श्री योगेश्वरी नागरी सहकारी पतसंस्थेस मार्च २०२५ अखेर ८५.२१ लक्ष रुपयांचा नफा मिळवला असल्याची माहिती पतसंस्थेचे अध्यक्ष माणिक वडवणकर, उपाध्यक्ष मनोज लखेरा आणि व्यवस्थापक गजानन कुलकर्णी यांनी दिली आहे. पतसंस्थेचे संस्थापक राजकिशोर मोदी यांचे बहुमूल्य आणि नियोजनबध्द व अभ्यासु मार्गदर्शन यांच्या बळावरच आज पतसंस्थेची यशस्वी घोडदौड सुरू असल्याची माहिती जाहीर केलेल्या प्रसिद्धी पत्रकात दिली आहे.

श्री योगेश्वरी नागरी सहकारी पतसंस्थेची मार्च २०२५ अखेरची वित्तीय स्थिती पुढीलप्रमाणे मांडली आहे. त्यामध्ये पतसंस्थेकडे एकूण २२५१ एवढे सभासद असून, पतसंस्थेचे एकूण भाग भांडवल रुपये ३ कोटी एवढे आहे . पतसंस्थेचा स्वनिधीं हा रुपये ६.३५ कोटी एवढा असून पतसंस्थेकडे सभासदांच्या तसेच ग्राहकांच्या एकूण ठेवी रुपये ५२ कोटी एवढ्या आहेत. तर सभासद व ग्राहकांना मार्च २०२५ अखेर पर्यंत कर्ज वाटप रुपये ४५ कोटी एवढे करण्यात आले असून पतसंस्थेची अंबाजोगाई पिपल्स बँक व अन्य ठिकाणची गुंतवणूक ही रुपये २५ .४८ कोटी एवढी असून ३१ मार्च २०२५ अखेर(आर्थिक वर्ष २०२४- २०२५) पतसंस्थेस रुपये ८५.२१ लक्ष रुपयांचा निव्वळ नफा झाला असल्याची माहिती पतसंस्थेचे अध्यक्ष माणिक वडवनकर यांनी दिली आहे.

श्री योगेश्वरी नागरी सहकारी पतसंस्था ही साधारणपणे पस्तीस वर्षापूर्वी एका छोट्याश्या खोलीत केवळ १० हजार रुपयांच्या गुंतवणुकीवर चालू करण्यात आली होती . पतसंस्थेच्या काटेकोर नियोजन , संस्थापक राजकिशोर मोदी यांचे मार्गदर्शन त्याचबरोबर सभासद , ठेवीदार व ग्राहकांच्या अतूट विश्वासाच्या बळावर श्री योगेश्वरी नागरी सहकारी पतसंस्थेने रुपये दहा हजारावरून आज ५२ कोटीचा टप्पा गाठला आहे . पतसंस्थेने हजारो छोटे मोठे व्यवसाईक , हातगाडी, फेरीवाले, भाजीपाला व फळविक्रेत्याना आर्थिक सहाय्य करून त्यांना त्यांचा व्यवसाय वाढीसाठी मदत करून त्यांचा व त्यांच्या कुटुंबाचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी सदैव प्रयत्न केला आहे . तसेच वेळोवेळी सभासदांबरोबरच इतर ग्राहकांच्या मुलांमुलींच्या शिक्षणासाठी , लग्नासाठी , घर बांधकाम करण्यासाठी तसेच नवीन जागा खरेदी करण्यासाठी देखील पतसंस्थेकडून वेळोवेळी आर्थिक मदत केली आहे . श्री योगेश्वरी नागरी सहकारी पतसंस्था ही वेळोवेळी अर्थार्जनासोबतच अनेक सामाजिक , शैक्षणिक उपक्रम राबविण्यात आघाडीवर असते. पतसंस्थेच्या वतीने प्रतिवर्षी गरीब ,होतकरू व दिव्यांग विद्यार्थ्यांना मोफत गणवेश तसेच शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात येत आहे. श्री योगेश्वरी नागरी पतसंस्थेची मातृबँक ही अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँक म्हणून कार्यरत आहे . श्री योगेश्वरी नागरी सहकारी पतसंस्था ही आजच्या घडीला केवळ पतसंस्था राहिली नसून ती एक मिनी बँक म्हणूनच ओळखल्या जाऊ लागली आहे .

श्री योगेश्वरी नागरी सहकारी पतसंस्था नावारूपाला आणण्यासाठी पतसंस्थेचे सर्व ग्राहक , सभासद , ठेवीदार तसेच कर्जदार यांच्यासह संस्थापक राजकिशोर मोदी , अध्यक्ष माणिक वडवणकर , उपाध्यक्ष मनोज लखेरा , तसेच संचालक कचरूलाल सारडा, ब्रह्मचारी इंगळे , सुनील वाघाळकर , रुपेश चव्हाण , शिरीष भावठाणकार, शेख अब्दुल शेख करीम , सय्यद अमजद , कल्याणी राहुल देशपांडे , जयश्री बाळासाहेब घाडगे यांच्यासह ॲड दयानंद लोंढाळ, जावेद छोटू गवळी तसेच पतसंस्थेचे सर्व कर्मचारी व पिग्मी प्रतिनिधी यांचे मोलाचे सहकार्य लाभले असल्याचे प्रसिद्धी पत्रकात उल्लेखित केले आहे.

# चकलांब्यात यंदा वस्त्रहरण चैत्र पौर्णिमेची जय्यत तयारी

बीड/प्रतिनिधी

काही वर्षांपूर्वी मराठी रंगभूमीवर प्रचंड गाजलेलं, मच्छिंद्र कांबळी यांचं 'वस्त्रहरण' हे धमाल विनोदी मालवणी नाटक मराठी भाषेत पुन्हा एकदा रंगभूमीवर धूमशान घालण्यास सज्ज होत आहे. या नाटकाचे आजवर ५२५४ प्रयोग झाले असून, लवकरच या नाटकाचा ५ हजार २५५ वा प्रयोग सादर होणार आहे. विशेष म्हणजे चकलंबा येथील कलाकारांच्या संचात या नाटकाचे मोजके ४४ प्रयोग केले जाणार आहेत.मराठी भाषेत रूपांतरित असलेले हे नाटक बघण्याची उत्सुकता लागली आहे,दि १२ एप्रिल रोजी चैत्र पौर्णिमाच्या दिवशी रात्री ८ वाजता हा नाट्य प्रयोग सादर होणार आहे

१६ फेब्रुवारी १९८० साली कै. मच्छिंद्र कांबळी यांनी, गंगाराम गवाणकर लिखित 'वस्त्रहरण' या नाटकाचा पहिला प्रयोग केला होता. व्यावसायिक मराठी रंगभूमीवर इतिहास घडवलेल्या आणि अनेक दिग्गजांकडून वाहवा मिळवणाऱ्या 'वस्त्रहरण' या अजरामर कलाकृतीला १६ फेब्रुवारी,२०२५ रोजी ४५ वर्षं पूर्ण झाली.दि १२ एप्रिल रोजी चकलंबा येथे चित्र पोर्णिमेनिमित्त हे नाटक पुन्हा रसिकांच्या भेटीला येत आहे. येत्या चैत्र पौर्णिमेला हे नाटक चकलांबा रंगभूमीवर गावातील कलाकार संदिप पारगावकर,डॉ.विजय सुलाखे,प्रा.सतीश सुलाखे, रविंद्र कानडे,सुभाष चोपडे , उदय सुलाखे,कालिदास चोपडे ,सुरेंद्र सुलाखे,दर्शन नाईक,किशोर खेडकर,मयुर कुलकर्णी,श्याम कोळसे , ऋषिकेश सुलाखे,शुभम चोपडे,कृष्णा कुलकर्णी, उन्मेष सुलाखे,महिला कलाकार -मंजुश्री जोशी,आशा तारे हे कलाकार हा प्रयोग सादर करणार आहेत,नाटकाच्या इतिहासात मैलाचा दगड ठरलेलं असं म्हटलं जातं.या नाटकाचे लेखक गंगाराम म.गवाणकर आहेत.या नाटकात कलाकारांना नेपथ्य व संगीताची उत्तम साथ लाभते.या नाटकात प्रवेश असून कथा ४४ वर्षे जुनी आहे,या नाटकाने चकलांबा येथील रंगमंच आणि रसिकांसाठी मनोरंजनाचे आगळेवेगळे नवे दालन उघडे केले आहे.नाटकाचे दिग्दर्शन इंजि.संतोष पारगावकर करत आहे तर ,सूत्रधार म्हणून धनंजय सुलाखे,संगीत दिग्दर्शन प्राध्यापक सतीश सुलाखे,संपादक प्रशांत सुलाखे,पुजा सुलाखे/सराफ, अर्णव सुलाखे करणार आहेत.सर्व प्रेक्षकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री रोकडेश्वर प्रासादिक नाट्य मंडळ चकलंबा यांनी केले आहे




# घरफोडी करणारे दोन सराईत चोरांना मुंब्रा पोलिसांकडून अटकेत

## दोन लाख १८ हजार किंमतीचा मुद्देमाल हस्तगत

ठाणे, दिवा

दि. २० मार्च २०२५ रोजी सायंकाळी ४ ते ६.४५ वाजता दरम्यान मुंब्रातील रहिवासी असलेले एक इसम उपवासाचा पवित्र रमजान महिना चालू असल्याने कपडे खरेदी करणेकरीता मुलाला घेवून मार्केटमध्ये गेले असता घराच्या दरवाजाचे कुलूप आरोपीने बनावट चावीने दरवाजा उघडून घरात प्रवेश करत कपाटाचे लॉकर तोडून त्या मधील ०७ तोळे सोन्याचे दागिने व २२ तोळे चांदीचे दागिने असा एकुण रू २,१८,०००/- घरफोडी करून पलायन केले अशी तक्रार मुंब्रा पोलिस ठाण्यास प्राप्त झाली असता पोलिसांनी सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण अधिकारी, अंमलदार यांनी गोपनिय बातमीदार यांचे मार्फत तपास करत असतांना आरोपी सुफियान शब्बीर शेख वय २२ वर्षे व आरोपी मेहराज साबितअली शेख, वय २२ वर्षे, यांना मुंब्रा ता. जि. ठाणे यांना काहीही सुगावा नसतांना संशयीत म्हणून ताब्यात घेवून त्यांच्याकडे गुन्हयाचे तपासाचे अनुषांगाने सखोल तपास केला असता त्यांनी सदर आपसात संगणमत करून तिसरा आरोपी फजल असे तिघांनी मिळून गुन्हा केल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे. अटक आरोपीतांकडे कौशल्यपुर्ण तपास करून घरफोडी चोरी केलेला ०७ तोळे सोन्याचे व २२ तोळे चांदीचे दागिने असा एकुण २,१८,०००/- अंदाजे जु.वा. किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

मा. पोलीस उप आयुक्त सुभाष बुरसे, परिमंडळ १, ठाणे, सहाय्यक पोलीस आयुक्त उत्तम कोळेकर. कळवा विभाग, वपोनि. अनिल शिंदे, पो.नि. नितीन पगार, संजय दवणे, राजु पाचोरकर यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि विनायक माने, पो.ह. देसले, गायकवाड, कांबळे, वसावे व पोशि, एडके, पाटोळे, सपकाळे, अव्हाड, सुर्यवंशी यांनी विशेष उल्लेखनिय कामगिरी केली आहे.



# तलवाडा येथील बालक भारत कावळे यांचे दिर्घ उपचारा दरम्यान दु:खद निधन

## तलवाडा परिसर हळहळला

तलवाड़ा ।प्रतिनिधि

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील सर्व परिचित आसलेले कृष्णा कावळे टेलर यांचा मुलगा भारत यास गत काही महिन्यापुर्वी श्वास घेण्यास आचानक त्रास होऊ लागल्याने कावळे कुंटुबीय हवालदिल झाले होते. आगदी १६ वर्ष वय आसलेल्या एकुलत्या एक बाळाला कावळे कुंटुबीयानी मुंबई, संभाजी, नगर(औरंगाबाद) बीड, गेवराई येथे उपचार केले. गेल्या तीन चार महिन्यात आणेक वेळा बाळाच्या तबियतीत सुधारणा देखील झाल्याचे निदर्शनास आले परंतु दैव लेखणी कधी कुणाला कळली! कावळे कुंटुबीया बरोबर मित्र परिवार व गावकरी या बाळाच्या तबियत मध्ये सुधारणा व्हावी या साठी मोठ्या प्रमाणात प्राथना देखील करत होते. अत्यंत हसरा बोलका आसणा-या बालकाने तब्बल चार महिने या दिर्घ आजाराला झुंज दिली. अपेक्षा नव्हती हे बाळ किंवा भगवंत आचानक एप्रिल फुल करेल या बाळाने एप्रिल रोजी सांयकाळी पाच वाजल्याच्या सुमारास अखेरचा श्वास घेतला. भारत कावळे या बाळाचे अखेर उपचारा दरम्यान दु:खद निधन झाले. त्यांचा अंत्यविधी आज दिनांक २ एप्रिल रोजी सकाळी ९-२७ वाजता कंकया श्मशान भूमी तलवाडा येथे अंत्यंत दु:खाकित वातावरणात करण्यात आला. कृष्णा कावळे व नाथा कावळे यांना आणेकांनी या वेळी धीर दिला. कावळे परिवारावर आचानक कोसळलेल्या या



आभाळभर दु:खाने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात असुन लोकदिशा परिवार कावळे परिवाराच्या दु:खात जड अंतकरणाने सहभागी असुन कावळे परिवारास भंगवत धीर दवो या प्राथनेसह भारत कावळे या बाळास भावपूर्ण श्रद्धांजली!

# आदिवासी सांस्कृतिक महोत्सव कोरपना तेथे संपन्न

मंगेश तिखट /चंद्रपूर

राज्याच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने आणि आदिवासी विकास विभागाच्या सहकार्याने काल दि. ३१ मार्च रोजी कोरपना येथे भव्य आदिवासी लोककला महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. कोरपना शहरात पहिल्यांदाच झालेल्या या ऐतिहासिक अशा कार्यक्रमाला राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ना. ड. आशिषजी शेलार, राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. प्रा. डॉ. अशोक उईके आणि राज्याचे माजी मंत्री, आमदार सुधीर मुनगंटीवार यांची प्रमुख उपस्थिती होती. माझ्या मतदार संघातील कोरपना तालुका हा आदिवासी बहुल आहे. या मतदारसंघात आदिवासी बांधवांच्या परंपरागत लोककलेला व्यासपीठ देण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम महत्वपूर्ण ठरला. राजुरा विधानसभेतील सर्वाधिक पेसा ग्रामपंचायती असणाऱ्या कोरपना तालुक्याच्या विकासासाठी पालकमंत्री ना. अशोकजी उईके हे अग्रणी राहून सहकार्य करतील तर शहरात अत्याधुनिक सुविधायुक्त सांस्कृतिक सभागृह व नजिकच्या मानिकगड किल्ल्याच्या संवर्धनासाठी ना. ड. आशिषशेलार हे विशेष लक्ष घालतील अशी आशा व्यक्त केली. प्रसंगीच मंत्रीमहोदयांनीही सकारात्मक प्रतिसाद देत आम्ही सदैव तुमच्यासोबत आहोत असे आश्वासित केले.

महोत्सवाच्या सुरवातीला पारंपरिक आदिवासी नृत्यासह शहरातून भव्य मिरवणूक निघाली. स्थानिकांनी ठिकठिकाणी मंत्रीमहोदयांचे स्वागत केले. याचवेळी मंत्री महोदयांनी आमच्या कोरपना येथील . सुधीर मुनगंटीवार सेवा केंद्र तथा भाजपा जनसंपर्क कार्यालयास ही भेट देऊन केंद्राचे सेवाकार्य समजून घेतले. या कार्यक्रमाला मंचावर आमचे नेते, राज्याचे माजी मंत्री आ. सुधीरभाऊ मुनगंटीवार, भाजपचे जिल्हा महामंत्री विवेक बोढे, उपविभागीय अधिकारी रविंद्र माने, तहसीलदार पल्लवी आखरे, मुख्याधिकारी येमाजी धुमाळ, प्रकल्प अधिकारी राचलवार, भाजपच्या आदिवासी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अरूण मडावी, तालुकाध्यक्ष संजय मुसळे, तालुका महामंत्री सतिश उपलेंचवार, अमोल आसेकर, प्रमोद कोडापे, वाघूजी गेडाम, विजय रणदिवे, पुरुषोत्तम भोंगळे, किशोर बावणे, आशिष ताजने, मनोज तुमराम, तिरूपती किन्नाके यांचेसह कोरपना तालुक्यातील नागरीकांची मोठी उपस्थिती होती.



# गटविकास अधिकारी श्रीम. समृद्धी दिवाने यांच्या विनंतीवरून व पत्रकार बांधवांच्या मध्यस्थीने दशरथ चवरे यांनी आमरण उपोषण सोडले

## चौकशी समिती मार्फत सदर कामाची चौकशी करून आठ दिवसात कारवाई करण्याच्या लेखी आश्वासनानंतर उपोषण मागे

केज/प्रतिनिधी

गटविकास अधिकारी श्रीम. समृद्धी दिवाने यांच्या विनंतीवरून व पत्रकार बांधवांच्या मध्यस्थीने दशरथ चवरे यांनी आमरण उपोषण सोडले आहे. यावेळी गट विकास अधिकारी श्रीमती समृद्धी दिवाने यांच्या तोंडी आदेशावरून ग्रामीण पाणीपुरवठा उपविभागीय अभियंता यांनी

चौकशी समिती मार्फत सोनीजवळा येथील जलजीवन मिशन अंतर्गत चालू असलेल्या कामाची चौकशी करून आठ दिवसात कारवाई करण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर दशरथ चवरे यांनी तात्पुरत्या स्वरूपात आमरण उपोषण मागे घेतले आहे. जर प्रशासनाने आठ दिवसात लेखी आश्वासनाप्रमाणे कारवाई केली नाही तर सध्या काम चालू असलेल्या जलजीवन योजनेच्या पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन करण्यात येईल असा इशारा चवरे यांनी प्रशासनाला दिला आहे.याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज तालुक्यातील सोनीजवळा येथे जलजीवन मिशन अंतर्गत पाईपलाईन व पाण्याच्या टाकीचे काम चालू आहे. सदर काम हे निकृष्ट दर्जाचे करण्यात येत आहे, सदर काम अंदाजपत्रकाप्रमाणे होणे गरजेचे असताना देखील सदरील कंपनी मनमानी करून बोगस काम करत आहे.

या कामासाठी ४ कोटी १३ लाख रुपये एवढा निधी मंजूर असून देखील सदर यंत्रणा ही स्वत:च्या फायद्या करिता सदर काम निकृष्ट दर्जाचे करित आहे त्याकरिता त्या कामाची तात्काळ एक समिती गठीत करून चौकशी करण्यात यावी, संबंधित (कंपनीचे) कन्ट्रक्शनचे लायसन रद्द करण्यात यावे, जलजीवन अंतर्गत पिण्याच्या पाण्याच्या टाकीचे काम थांबवण्यात यावे, सदर काम हे अंदाजपत्रकाप्रमाणे होत नाही, सदरचे काम हे अंदाज पत्रकाप्रमाणे करण्यात यावे, सदर कामाची चौकशी होईपर्यंत तात्काळ काम थांबवून सदर कंपनीचे देयक अदा करू नये, जर सदर कामाची आपल्या स्तरावरून एक समिती गठीत करून चौकशी केले नाही तर दिनांक २ एप्रिल २०२५ रोजी पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषण करणार आहे




अशा आशयाचे लेखी निवेदन दशरथ चौरे यांनी दिनांक १९ मार्च २०२५ रोजी गट विकास अधिकारी पंचायत समिती केज यांच्यासहसंबंधित कार्यालयाला दिले होते. परंतु सदर तक्रारीच्या अनुषंगाने कसल्याच प्रकारची दखल न घेतल्यामुळे निवेदनात दिलेल्या इशारा प्रमाणे दशरथ चवरे हे दिनांक २ एप्रिल रोजी सकाळी पंचायत समिती कार्यालयाच्या प्रांगणामध्ये आमरण उपोषणास बसले होते.

गट विकास अधिकारी श्रीमती समृद्धी दिवाने या पंचायत समिती कार्यालयात येत असताना त्यांना उपोषण चालू असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले असता त्यांनी तात्काळ कर्मचाऱ्यांना बोलावून उपोषणाची चौकशी केली.

गटविकास अधिकारी यांनी चौकशी केली असता सदर उपोषण हे जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग,केज यांच्याशी निगडित असल्याचे समजल्यानंतर त्यांनी तात्काळ सदर विभागाचे अधिकारी कर्मचारी यांच्याशी संपर्क करून अधिकारी कर्मचारी यांना तोंडे आदेश देऊन सांगितले की, तात्काळ उपोषणाची दखल घेऊन उपोषणापासून दशरथ चवरे यांना परावृत्त करावे व सदर कामाची तात्काळ चौकशी करून संबंधित दोषीवर योग्य ती कारवाई करण्यात यावी. त्याचबरोबर सहाय्यक गट विकास अधिकारी अभिमान राठोड यांनीही सदर विभागाच्या अधिकारी यांना सूचना देऊन सदर उपोषणाची दखल घेण्याचे सांगितले होते.

गटविकास अधिकारी समृद्धी दिवाने यांनी उपोषण स्थळी भेट देऊन दशरथ चवरे यांच्यासोबत चर्चा करून त्यांच्या तक्रारीचे निरसन करून त्यांना उपोषण सोडण्याची विनंती केली व पत्रकार बांधवांनी देखील यावेळी मध्यस्थी केली त्यामुळे दशरथ चवरे यांनी तात्पुरत्या स्वरूपात आमरण उपोषण मागे घेतले आहे. यावेळी पत्रकार रामदास तपसे, तात्या गवळी, वसंत सोनवणे, अशोक नागरगोजे, मुबाशीर खतीब, धनंजय कुलकर्णी, महादेव काळे, ड. निखिल बचुटे, रमेश इतापे, रंजीत घाडगे, शेख सत्तार (मौलाना) ग्रामीण पाणीपुरवठा उपविभागीय अभियंता श्रीमती वंदना साळवे, कनिष्ठ अभियंता आनंद चव्हाण, कनिष्ठ सहाय्यक व्यंकट शेरेकर इत्यादी उपस्थित होते.

दशरथ चवरे यांच्या आमरण उपोषणास भीमशक्ती सामाजिक संघटनेचे मराठवाडा संघटक चंद्रकांत खरात सर यांनी भेट देऊन त्यांच्यासमित चर्चा केली व भीमशक्ती सामाजिक संघटनेचे केज तालुकाध्यक्ष अक्षय वाघमारे व अशोक सरवदे यांनी सदर उपोषणास भेट देऊन भीमशक्ती सामाजिक संघटना केज तालुक्याच्या वतीने त्यांच्या स्वाक्षरीचे पाठिंब्याचे पत्र देऊन पाठिंबा दर्शविला. भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे राज्य मध्यवर्ती समिती सदस्य भाई मोहन गुंड यांनी या उपोषणास भेट देऊन दशरथ चवरे यांच्याशी चर्चा करून गुंड यांनी लेखी पत्र देऊन उपोषणास जाहीर पाठिंबा दिला.




# तांदळवाडी येथे तालुक्यातील सर्व विभाग एकत्रित येऊन गावकऱ्यांसोबत भरवला ग्रामदरबार

किल्लेधारूर/अविनाश जगताप

तालुक्यातील तांदळवाडी येथे आज दि. २ एप्रिल रोजी मा.विभागीय आयुक्त यांच्या आदेशानुसार ग्रामपंचायत कार्यालय तांदळवाडी येथे एक दिवस गावाकऱ्यासोबत ग्रामदरबार हा नावीन्यपूर्ण कार्यक्रम मा.सह गटविकास अधिकारी श्री कांदे साहेब यांच्या उपस्थितीत व मा. सरपंच श्री पंडित साखरे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला होता.

मा.विभागीय आयुक्त यांच्या आदेशानुसार ग्रामपंचायत कार्यालय तांदळवाडी येथे एक दिवस गावाकऱ्यासोबत ग्रामदरबार हा कार्यक्रम मा.सह गटविकास अधिकारी श्री कांदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सन्मानीय राऊत साहेब, माने साहेब, पालेकर साहेब, यांच्या उपस्थितीमध्ये तालुक्यातील ग्रामपंचायत विभाग, कृषी विभाग,शिक्षण विभाग,महिला व बालकल्याण विभाग,आरोग्य विभाग,पशुसंवर्धन विभाग,पाणी पुरवठा विभाग,समाज कल्याण विभाग,स्वछता विभाग,सिंचन व जलसंधारण विभाग या सर्व विभागाच्या प्रमुखाणी उपस्थित राहून तांदळवाडी येथील ग्रामस्थांना मार्गदर्शन केले कार्यक्रमाचे प्रास्ताविक आदर्श ग्रामपंचायत अधिकारी श्री बाळासाहेब झोंबाडे यांनी केले व आभार आदर्श सरपंच श्री पंडित साखरे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी तांदळवाडी येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्तिथ होते.

# आद्य वचनकार लिंगायत हटगर कोष्टी समाज कुलगुरू श्री श्री श्री देवरदासी मैया यांची जयंती साजरी



अंबाजोगाई (प्रतिनिधी)

आद्य वचनकार लिंगायत हटगर कोष्टी समाज कुलगुरू श्री श्री श्री देवरदासी मैया यांची १०४६ वी जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरी करण्यात आली. हा भव्य सोहळा श्री रामलिंग चौंडेश्वरी व नवनाथ महाराज मंदिर (गढीवर), कोष्टी गल्ली, अंबाजोगाई येथे संपन्न झाला.कार्यक्रमाच्या प्रारंभी माता चौंडेश्वरी देवी व आद्य वचनकार लिंगायत हटगर कोष्टी समाज कुलगुरू श्री श्री श्री देवरदासी मैया यांची सौ. सीमा प्रदीप वरवटकर महिलाअध्यक्ष महाराष्ट्र राज्य लिंगायत हडगार कोष्टी समाज संस्था महाराष्ट्र राज्य, शाखा अंबाजोगाई यांच्या हस्ते विधीवत पूजन करण्यात आले. या पावन सोहळ्यात समाजातील असंख्य बंधू-भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या श्रद्धेचा आणि एकात्मतेचा ठेवा जपला. विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांच्या माध्यमातून श्री देवरदासी मैया यांच्या विचारांचा आणि शिकवणीचा महिमा उलगडण्यात आला.यावेळी विविध मान्यवरांनी समाज एकता, आध्यात्मिक विचारधारा आणि संस्कृतीच्या जतनाचे महत्त्व यावर प्रकाश टाकला. जयंती उत्सवाने समाजामध्ये नवचैतन्य निर्माण करत, भक्तिभाव आणि प्रेरणादायी विचारांची जागृती घडवली.यावेळी सिमा शेंगोळे,मीराताई मसनाळे,रूक्मिणबाई रूघे, संजीवनी शेंगोळे,...अरूणा हरदास,अंजली उमराणे,किशोरी शेंगोळे,श्रद्धा मसनाळे यांच्यासह अंबाजोगाई लिंगायत हडगार कोष्टी समाज संस्था शाखा अंबाजोगाई चे अध्यक्ष नरसिंह कानडे,शुभंम मसनाळे,गणेश कानडे,राजेंद्र हाट्टे,विलास द्रुकर,संतराम घोळक, नारायण कानडे विष्णु मसनाळे,दिवाकर मसनाळे हनुमंतराव चौधरी ,सुनिल शेंगोळे देवराव हरदास तसेच अंबाजोगाई कोष्टी समाज अध्यक्ष नारायण हरेगावकर,महाराष्ट राज्य लिंगायत हडगार कोष्टी संस्था संचालक प्रविण उमराणे ,राष्ट्रीय अध्यक्ष किशोर गिरवलकर आदीसह समाज बांधव, भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या बीड दौरा पार्श्वभूमीवर शरद पवार गटाच्या राज्य प्रवक्ता हेमा पिंपळे यांना नजर कैदेत ठेवण्यात आले आहे.जिल्ह्यातील विविध मागण्यांसाठी हेमा पिंपळे आंदोलन करणार होत्या.मात्र त्यापूर्वीच त्यांना सकाळपासून नजर कैदेत ठेवले गेले आहे. बीड पोलीस पिंपळे यांच्या निवासस्थानाबाहेर ठाण मांडून आहेत.

## खंदारे गुरुजींची गुरुवचने






**डॉ संगिता पिंगळे**
**बीड**

अणू हे सूक्ष्म परंतु पूर्ण रूप आहे ब्रह्मांडाच. असे गुरुजींनी स्पष्ट केले आहे. अणू हा सर्वात लहान कण आहे. दोन अणूचा संयोग झाला की रेणू बनतो. असेच मुलद्रव्य आणि घटक तयार होत होत अवघे ब्रह्मांड तयार झाले आहे. कुठलाही प्राणी, मनुष्य, वस्तु सर्व काही अणूचेच वेगवेगळे रूप आहेत आणि हे विश्व किंवा ब्रह्मांड हे अणूचे व्यापक रूप आहे. त्यामुळे अवघी एकाचीच वीण असे गुरुजी सांगतात. एक अणूची संरचना कळाली की सर्वच ज्ञात होते. पिंडी ते ब्रह्मांडी हा बोध होतो. अणूच्या आत तीन सूक्ष्म कण आहेत. प्रोटोन आद्य कण ब्रम्हा आहे, इलेक्ट्रॉन हा प्रोटोनचा १८३६ वा भाग आहे, तो कार्यकारी विष्णू आहे अन नुट्रॉन समेटून घेणारा शंकर आहे. प्रोटोन आणि इलेक्ट्रॉन एकत्र आले की नुट्रॉन तयार होतो. म्हणजे सृष्टीचा लय होतो. पुन्हा नुट्रॉन चे विभाजन होऊन आद्य कण प्रोटोन आणि इलेक्ट्रॉन तयार होतात आणि पुन्हा त्याद्वारे विश्व निर्मिती. हे चक्र चालू राहते. उत्पत्ती, स्थिती, प्रलय. गुरुजी तुम्ही विज्ञान एवढे सर्वांगाने समजून दिल्याने त्यातील गूढ अध्यात्मही सहज कळाले. थँक्स गुरुजी आपला नित्य जयजयकार असो.

# लोकशाही पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्य आयोजित राज्यस्त्रीय लोकरत्न व आदर्श पुरस्कार सोहळा २०२५

स. नं. वी. वी. लोकशाही पत्रकार संघाच्या वातिने गेल्या ८ वर्ष्यापासून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना लोकरत्न राज्यस्तरीय लोकरत्न, समाजरत्न,कृषीरत्न,शिक्षणरत्न,उद्योगरत्न,, सहकाररत्न, साहित्यरत्न, कलारत्न, क्रीडारत्न, आरोग्यरत्न, आदर्श पत्रकार,आदर्श पोलीस, आदर्श व्यक्ती,आदर्श ग्रामपंचायत, आदर्श शिक्षक,आदर्श प्राध्यापक, आदर्श शासकीय अधिकारी,आदर्श कॉन्ट्रॅक्टर, आदर्श वकील, आदर्श शाळा यांना राजस्थानचे राज्यपाल महामहिम हरिभाऊ नाना बागडे यांच्या हस्ते लोकरत्नसह विविध रत्न पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत, हा सोहळा संभाजीनगर येथील एकनाथ रंगमंदिर येथे करण्याचे आयोजित केले आहे. १९ एप्रिल २०२५ रोजी दुपारी ३ वाजता हा पुरस्कार सोहळा संपन्न होणार आहे.

महामहीम राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्यासह ५ मंत्र्यांच्या उपस्थितीत; लोकशाहीचा लोकरत्न पुरस्कार सोहळा शाही थाटात होणार साजरा!लोकशाही पत्रकार संघाच्या लोकरत्नसह विविध क्षेत्रातील राज्यस्तरीय पुरस्कारास प्रस्ताव पाठवावे- प्र. अ. प्रताप साळुंके

संभाजीनगर (प्रतिनिधी)

लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने यावर्षी लोकरत्न, पुरस्कारासह विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या दिग्जांना राज्यस्तरीय समाजरत्न,कृषीरत्न,शिक्षणरत्न,उद्योगरत्न,, सहकाररत्न, साहित्यरत्न, कलारत्न, क्रीडारत्न, आरोग्यरत्न, आदर्श पत्रकार,आदर्श पोलीस, आदर्श व्यक्ती,आदर्श ग्रामपंचायत, आदर्श शिक्षक,आदर्श प्राध्यापक, आदर्श शासकीय अधिकारी,आदर्श कॉन्ट्रॅक्टर, आदर्श वकील, आदर्श शाळा यांना राजस्थानचे राजस्थानचे राज्यपाल महामहिम हरिभाऊ नाना बागडे यांच्या हस्ते लोकरत्नसह विविध रत्न पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत, हा सोहळा संभाजीनगर येथील एकनाथ रंगमंदिर येथे करण्याचे आयोजित केले आहे. १९ एप्रिल २०२५ रोजी दुपारी ३ वाजता हा पुरस्कार सोहळा संपन्न होणार आहे.

या कार्यक्रमासाठी माननीय महामहीम राज्यपाल हरिभाऊ नाना बागडे , राज्याचे सामाजिक न्याय मंत्री मा. संजयजी शिरसाठ, कॅबीनेटमंत्री अतुलजी सावे, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे,मा. पालकमंत्री तथा मंत्री खासदार सांदिपानजी भुमरे पाटील, माजी खा. इम्तियाज जलील, आ. प्रदीप जैस्वाल, आ. संदीप क्षीरसागर, आ. प्रशांत बंब,राष्ट्र संत रामगिरीजी महाराज, मराठवाड्यातील आय ए. एस./ आय पी एस अधिकारी यांचीही उपस्थिती राहणार आहे लोकरत्नसह विविध रत्न पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत, हा सोहळा संभाजीनगर येथील एकनाथ रंगमंदिर येथे करण्याचे आयोजित केले आहे. १९ एप्रिल २०२५ रोजी दुपारी ३ वाजता हा पुरस्कार सोहळा संपन्न होणार आहे.

लोकशाही पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्य लोकरत्न पुरस्कार सोहळा २०२५ कोर कमिटी

भागवत वैद्य बीड ८४५९६९७३२८/ संदीप जाधव मुंबई ८७८८७३४४४०/ प्रताप साळुंके संभाजीनगर ७५८८१९७४०५ /गणेश जगदाळे नाशिक ९०७५० १७५०८/आयेशा मुलानी जालना ९८२२०२१८७५ / निलोफर शेख सिल्लोड ९१४६६ ५६५६३/ श्रद्धा कंडूडे पुणे ९२०९६५१००४/ जयश्री बस्ते नाशिक ९१६८७ ००१०९/ अयुब पठाण संभाजीनगर/ ८३२९५४६८५०/ सुनील महाकुंडे ९३७३७ ३९२३३/पाटील शुभा पुणे ९८९०७ ९४६७० / महेबूब शेख परभणी ७२१८२५४२५२/ वसीम आजाद ९७३०४ २४३४३ /प्रभाकर पांडे नांदेड ९९७५०३४२०७/बाजीराव गायकवाड धाराशिव ७०६६९ ५३८०८ /अनिस कुरेशी संभाजीनगर ९५४५४९३५४४ /अरिफ सय्यद नांदेड ९८६०८ २१५५२/ अंबादास सर सोलापूर ८८८८७७२५५३/ नितीन जाधव लातूर ९८८१८ २८२३०/अस्लम खान जळगाव ९१४५१ ६१५८३/गणेश चेडे अंबड +९१ ९५५२३ ०७६५२/संध्या सरोदे परळी ७७२१० ५३५०८/सुनील भोसले ९१४६२ ४१९५६/साजेद सय्यद बीड ९०२८९ ६७०६०/ फैमीदा शेख रत्नागिरी ७६६६० १६८५२/राणीताई झिंजूर्डे पाटील ८०१०६ ५३०२९

ज्यांना लोकरत्न, सह विविध पुरस्कारासाठी आपले नामनिर्देशित करायचे असेल त्यांनी कमिटीशी संपर्क साधावा असे आवाहन संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

आभारी आहे.

लोकशाही पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्य आयोजित लोकरत्न, आदर्श पुरस्कार सोहल्यास आपण दिलेल्या योगदानाबद्दल------------------ साभार मिळाले. धन्यवाद!

फोन पे नं. ८४५९६९७३२८ गुगल पे नं. ९०७५८८७३२८ प्रतिनिधी योगदान कर्ता

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक हंडीबाग दत्तात्रय बालासाहेब यांनी निर्मिती प्रिंटस् कबाड गल्ली, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापून कार्यालय : दैनिक मराठवाडा दर्शन, माधव नगर, धारूर रोड, केज ता.केज जि.बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - हंडीबाग दत्तात्रय बालासाहेब

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY HANDIBAG DATTATRAY BALASAHEB AND PUBLISHED BY HANDIBAG DATTATRAY BALASAHEB ON BEHALF OF HANDIBAG DATTATRAY BALASAHEB AND PRINTED AT NIRMITEE PRINTS, KABAD GALLI, BEED TQ.DIST.BEED-431122 AND PUBLISHED AT.THE OFFICE OF DAILY MARATHWADA DARSHAN, At.MADHAV NAGAR, DHARUR ROAD, KAIJ TQ.KAIJ, DIST.BEED ( MAHARSHTRA). EDITOR- HANDIBAG DATTATRAY BALASAHEB